बातमीपत्र
पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
माहिती कक्ष, दि ०७ ऑक्टोबर २०२५

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८२२/२०२५ भा.न्याय संहिता कलम ३१८(१)(४),३१६(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | जुन २०२१ रोजी ते आजतागायत, मजरेवाडी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/१०/२०२५ रोजी २१.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सलीम चांदसाब सय्यद, वय- ४४ वर्षे, रा. ०२, साईनाथ नगर १, मजरेवाडी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अलिम इरफान शेख, रा. १३०/२०, सिध्देश्वर पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत मजकुर याने मौजे मजरेवाडी जुना सर्व्हे नं २५२/२ब नवीन सर्व्हे नं. ५९/२, पैकी अमर इस्टेट पार्ट २, प्लॉट नं. ३२९ यासी क्षेत्रफळ ३६२७.१४ चौ फुट असे वर्णनाची जागा त्याची आई बदर सय्यद व पत्नी अमरीन अलीम शेख यांचे नावे असलेली जागा बनावट दस्तऐवज असल्याचे माहित असताना ते तयार करुन त्याची विक्री होत आहे हे महित असताना फिर्यादीसोबत विक्री व्यवहाराबाबतचा व्यवहार करुन रोख २ लाख रुपये घेवून तसेच २ लाख रु चा सिंडीकेट बँक सोलापूर चा चेक घेवून इसारा पावती घेवून फिर्यादीची नमुद रक्कमेची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- पोसई- गाढवे- ९५१८५१०३९३ |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६७७/२०२५ भा.न्याय संहिता कलम ११७(२)११५,३५२ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०६/१०/२०२५ रोजी २१.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/१०/२०२५ रोजी २०.२४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सोनाली राजेश्वर नवगिरे, वय- ३२ वर्षे, रा. न्यु बुधवार पेठ, बॉबी चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | राजेश्वर शंकर नवगिरे, रा. न्यु बुधवार पेठ, बॉबी चौक, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा मुलगा व शेजारील मुले यांच्यात किरकोळ भांडण होवून मुलगा घरी आल्यावर फिर्यादीने पती यातील वरील आरोपीत याने राग मनात धरुन मुलगा यास मारहाण करत असताना फिर्यादीने आरोपीतास विनाकारण मारहाण का करता असे म्हणाले असता, आरोपीताने फिर्यादीस रागाने शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण करुन हाताने जोरात किचन कट्टयावर ढकलुन दिले. त्यामुळे फिर्यादीचे डोके किचन कट्टयावर जोरात आपटल्याने डोकीस व डावे डोळयाचे वर गंभीर दुखापत झाले आहे म्हणून. तपास:- पोसई- येळे- **८७६७००२७१८** |

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७०६/२०२५ भा.न्याय संहिता कलम ३१८(४),३१६(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | फेब्रुवारी २०२५ ते जुन २०२५ रोजी चे दरम्यान वेळोवेळी, साई मोटार्स गॅरेज, एम जी शोरुम चे समोर बाळे, पुणे रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/१०/२०२५ रोजी २०.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आयुब अब्दुल शेख, वय- ३७ वर्षे, व्यवसाय- मेकॅनिक, रा. मु.पो. हिरज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) निलेश्वर मनोजकुमार शोधे, रा. डी/२, आहिल्या एन्क्लेव्ह, महेश गार्ड, लाईन- १५, बटालियन साफ, आर्मी हेड कॉर्टर, इंदौर, मध्य प्रदेश, २) विजय प्रताप राशंकर, रा. घर नं. २०१, शांती कॉलनी, महु गाव, इंदौर, मध्य प्रदेश |
| **फसवणुक र.** | : | ३०,३९,९९९/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीचे गॅरेजमध्ये मेकॅनिक म्हणून काम करणारा १) सोमनाथ अशोक तडवळकर यास आवरा कार क्रं. एम एच ०२ एफ एक्स २४०२ चे मोबाईलमध्ये फोटो दाखवून विकत घेवून देतो म्हणून २ लाख रुपये घेतले आहे. २) फिर्यादीचे गॅरेज मध्ये वाहने वॉशिंग करणारा शिवाजी देवीदास सदगर यास इरटिका कार क्रं. एम एच १७ सी एक्स २५८६ चे मोबाईल फोनमध्ये फोटो दाखवुन विकत घेवून देतो म्हणून ३ लाख रुपये घेतले आहेत. ३) फिर्यादीचे गॅरेज शेजारील मन्नान इब्राहिम इनामदार यास देखील क्रेटा कार क्रं. एम एच १४ के एन ९१११ चे मोबाईलमध्ये फोटो दखवून त्याची किंमत ३ लाख असल्याचे सांगुन १ लाख ५० हजार रुपये घेतले आहेत. ४) फिर्यादीचे गॅरेज शेजारील चिकन विक्रीचे दुकानदार युसुफ गुलाब पठाण यास इरटिका कार क्रं. एम एच ४७ ए एस ३१०५ ही २ लाख ७५ हजार रुपयेस विकत घेवून देतो म्हणून २ लाख २५ हजार रुपये घेतले आहेत. ५) दुचाकी रिपेअरी गॅरेज चालक इक्बाल मैनोद्दीनर पटेल यास एसन्ट कार क्रं. एम एच १३ एच एन ०९४२ चे मोबाईल मध्ये फोटो दाखवून एक एच एफ डिलनक्स मोटार सायकल ४० हजार रुपयेस विकत घेऊन देतो असे म्हणून आरोपीत क्रं. २ यांचे मोबाईल फोन पे यामध्ये २० हजार पाठवून दिले. तसेच ६) फिर्यादीच्या ओळखीचा मित्र चोला मंडळ फायनान्स सोलापूर येथे वसुली एजंट म्हणून काम करणारा अब्दुल रहमान लाडलेसाब शेख यास क्रिस्टा क्रं. एम एच १२ टी एच ९३९३ स्वस्तात घेऊन देतो म्हणून रोख व ऑनलाईन २ लाख ९९ हजार रुपये घेतले आहेत. ७) फिर्यादीचा मित्र श्रीकांत मुंढे रा. धाराशिव हे यांना देखील महिंद्रा फायनान्स मधुन स्वस्तात कारगाडी घेवुन देतो म्हणून आरटीजीएस व्दारे ४ लाख रुपये स्विकारले आहेत. अशा प्रकारे फिर्यादीकडुन व वरील सर्व लोकांकडुन आम्ही महिंद्रा फायानन्सचे वाहन लिलाव अधिकारी म्हणून काम पाहतो, तुम्हाला कार गाडया कमीत कमी किंमतीमध्ये विकत घेवून देऊ असे विश्वासाने सांगुन तसेच फिर्यादीचे मालकीचे विवो कंपनीचे वि-५० मोबाईल हॅन्डसेट मोबाईल काही दिवस वापरु परत आणुन देतो असे म्हणून विश्वासाने घेऊन जाऊन एकुण ३० लाख ३९ हजार ९९९ रुपये रक्कमेची वरील आरोपीत क्रं. १ व २ यांनी संगणमत करुन फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- सपोनि- पाटील- **८७७९३९७११२** |